بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ

لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# श्रद्धा आणि निष्ठेचे मानक बद्री सहाबांच्या पवित्र जीवनातील महत्त्वपूर्ण प्रसंगांचा उल्लेख

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक २७ जानेवारी २०२३, मशिद मुबारक, टिलफर्ड, (यु.के)

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِينَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّينِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِينُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيمَ۔ صِرَاطَ الَّذِينَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّينَ۔

तशहहूद, तआवुज आणि सुरह फातिहा च्या पठना नंतर हुजूर अनवर म्हणाले की,
आज मी पवित्र पैगंबर (स.) यांच्या काहीं सोबतींचा उल्लेख करेन. पहिला उल्लेख हजरत अबु लबाबा बिन अब्दुल मुंज़िर यांचा आहे. त्यांच्याबद्दल आणखी काही कथने मिळाले आहेत. अल्लामा इब्न अब्द अल-बर आपल्या अल-इस्तेयाब या ग्रंथात लिहितात की हजरत अब्दुल्लाह इब्ने अब्बास यांनी पवित्र कुरआन ची आयत,

وَاٰخَرُوۡنَ اعۡتَرَفُوۡا بِذُنُوۡبِهِمۡ خَلَطُوۡا عَمَلًا صَالِحًا وَّاٰخَرَ سَيِّئًا

अर्थात आणि अन्य काही असे आहेत ज्यांनी आपल्या चुका मान्य केल्या आहेत. त्यांनी चांगली कामे वाईट कामात मिसळली होती; बद्दल सांगतात की ही आयत अबू लबाबा आणि त्यांच्यासोबत असलेल्या सात किंवा आठ पुरुषांबद्दल आहे, जे तबूकच्या युद्धात मागे राहिले होते. नंतर त्यांनी परमेश्वरवाला पश्चात्ताप केला आणि स्वतःला खांबांशी बांधून घेतले. त्यांचे चांगले कृत्य तेच होते आणि त्यांचे वाईट कृत्य जिहादपासून मागे राहणे होते.

मजमा बिन जरियाह वर्णन करतात की हजरत अनीस बिन कतादाह यांच्या हौतात्म्यानंतर, त्यांच्या पत्नीच्या वडिलांनी हजरत खानसा बिंत खुद्दाम यांनी तिचा विवाह मुझैना समुदायातील एका पुरुषाशी केला, जो तिला आवडत नव्हता, ज्यावर प्रेषित (स.) यांनी तिचे लग्न रद्द केले, त्यानंतर हजरत अबु लबाबा यांनी तिच्याशी विवाह केला, ज्यांच्यापासून हजरत साएब बिन अबु लबाबा यांचा जन्म झाला. अब्दुल्लाह बिन अबी यज़िद सांगतात की, आम्ही हजरत अबु लबाबा सोबत त्यांच्या घरी गेलो आणि तिथे फाटलेल्या जुन्या कपड्यात एक माणूस बसला होता जो म्हणाला की पवित्र पैगंबर (स.) यांनी असे सांगितले आहे की जी व्यक्ति पवित्र कुरआन सुंदर आणि सुरेख तऱ्हेने पठन करत नाही किंवा करण्याचे प्रयत्न करत नाही तो आमच्यापैकी नाही.

यानंतर हज़रत अबु अल-ज़ियाह बिन थाबित बिन नुमान यांचा उल्लेख आहे. एका कथनानुसार, बद्रच्या युद्धात दगडाच्या टोकाने पायाला जखम झाल्यानंतर त्याना परत जावे लागले, ज्यावर पैगंबर (स.) यांनी युद्धधन मध्ये त्यांचा भाग ठेवला होता.

यानंतर हज़रत अन्सा मोली (स.) यांचा उल्लेख आहे. इमाम अल-जुहरी सांगतात की अल्लाहचे पैगंबर (स.) जुहर नंतर भेटणाऱ्यांना परवानगी देत असत आणि हजरत अन्सा ही परवानगी प्रेषित कडून घेत असे.

त्यानंतर हजरत मुर्शद बिन अबी मुर्शद यांचा उल्लेख आहे. इम्रान बिन मनाह सांगतात की, जेव्हा अबू मुर्तद आणि त्यांचा मुलगा मुर्शद बिन अबी मज़द यांनी मदिना येथे स्थलांतर केले, त्या वेळी ते दोघे हजरत कुलसूम बिन हिदम यांच्या घरात थांबले होते. मुहम्मद बिन उमर सांगतात की त्यांनी उहुदच्या युद्धातही भाग घेतला होता. हजरत अबु मुर्शद कान्नाझ, हे हजरत अबू हमजा चे समवय आणि मित्र होते. हजरत अबु मुर्जद आणि त्यांचा मुलगा हजरत मुर्शद या दोघांनाही बद्रच्या युद्धात भाग घेण्याची परवानगी होती.

त्यानंतर हजरत अबू मुर्शद कान्नाझ बिन अल-हुसैन अल-गन्वी यांचा उल्लेख आहे. रबीउल-अव्वाल १२ हिजरी रोजी, पवित्र प्रेषित (स.) यांनी त्यांचे काका हजरत हमजा बिन अब्दुल मुत्तलिब यांच्या नेतृत्वाखाली उंटांवर स्थलांतरित लोकांचा एक गट मदिनाहून सैफ अल-बहरच्या दिशेने पाठवला, जिथे अबू जहल हा मक्काचा मुख्य शासक होता. आणि त्याच्या तीनशे घोडेस्वारांच्या सैन्याचा सामना केला. दोन्ही सैन्ये युद्धासाठी रांगेत उभे होते आणि त्या भागाचा प्रमुख मजदी बिन अमर अलजुहनी, या क्षेत्राचा प्रमुख मुईद बिन अमर अल-जबुनी याने दोन्ही पक्षांमध्ये हस्तक्षेप केला आणि युद्ध थांबवले. ही मोहीम सिरया हमजा बिन अब्दुल मुत्तलिब या नावाने ओळखली जाते. या युद्धा मध्ये हजरत अबू मुरसद यांचाही समावेश होता. हदीसमध्ये प्रसिद्ध आहे की प्रेषित (स.) यांनी पहिला ध्वज हजरत हमज़ा यांना बांधला आणि या युद्धात हजरत हमजाचा ध्वज हजरत अबू मुरसद यांनी उचलला होता.

त्यानंतर हजरत सलित बिन कैस बिन अमर यांचा उल्लेख आहे. हजरत सलित बिन कैस बिन अमर हे अन्सारच्या खजरज समुदायातील बनू आदि बिन नज्जारचे होते. मक्का जिंकण्याच्या प्रसंगी आणि हुनैनच्या लढाईच्या प्रसंगी, अन्सारच्या बनू माझीन समुदायाचा झेंडा हजरत सलित बिन कायस यांच्याकडे होता. १३ हिजरी च्या सुरूवातीला आणि काहींच्या मते १४ हिजरी मध्ये हजरत उमरच्या खिलाफत काळात मुस्लिम आणि पर्शियन यांच्यात जसर ची लढाई झाली. या युद्धात दोन हजार इराणी मारले गेले, तर काही कथनेनुसार सहा हजार इराणी मारले गेले. तसेच काहींच्या मते अठराशे किंवा चार हजार मुस्लिम शहीद झाले. या हुतात्मां मध्ये हजरत सलित बिन कैस यांचाही समावेश होता.

यानंतर हजरत मुजर बिन झियाद यांचा उल्लेख आहे. हजरत मुजर बिन झियादने इस्लामपूर्व युगात, स्वेद बिन सामित चा वध केला होता. नंतर हजरत मुज्जर आणि हजरत हारिस बिन स्वेद बिन समित यांनी इस्लाम स्वीकारला, परंतु हजरत हारिस बिन स्वेद यांनी आपल्या वडिलांच्या हत्येचा बदला घेतला. जेव्हा उहूद युद्धामध्ये कुरैश कबिले ने मुस्लिमांवर हल्ला केला तेव्हा हारिस बिन सुवैदने हजरत मुज्जर (र.ज) यांच्या मानेवर पाठीमागून वार करून त्यांची हत्या केली. हजरत जिब्रील यांनी पवित्र प्रेषित (स.) यांना खबर दिली की हारिस इब्न सुवैद ने हजरत मजुरला फसवणूक करून ठार मारले आणि मुजारच्या बदल्यात हरितला मारण्याचा आदेश दिला. उवायम बिन सईदाहने कुबा मशिदीच्या प्रवेश द्वारावर हरीथ बिन सुवायदला ठार मारले.

त्यानंतर हजरत रफा बिन रफा बिन मलिक बिन अजलान यांचा उल्लेख आहे. रफा बिन राफे बिन मलिक बिन अजलान आपल्या मौस भाऊ मुआद बिन अफरासह मक्केला पोहोचले आणि जेव्हा

ते सानिया टेकडीवरून खाली आले तेव्हा त्याने एक व्यक्ती पाहिली जे पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) होते. आम्ही त्यांना ओळखले नाही आणि त्यांना विचारले की पैगंबराचा दावा करणारी व्यक्ती कुठे आहे? ते म्हणाले की तो मीच आहे. आमच्या विनंतीनुसार, त्यांनी आम्हाला इस्लामबद्दल सांगितले. हजरत रफा बैतुल्लाच्या तवाफसाठी गेले आणि प्रार्थना केली, त्यानंतर त्यांनी कलीमा पठण करून इस्लामचा स्वीकार केला.

हजरत रफा म्हणतात की एक दिवशी आम्ही अल्लाहच्या प्रेषिताबरोबर मशिदीत बसलो होतो, तेव्हा एक बेदुइन व्यक्तीने नमाज अदा केली आणि पवित्र पैगंबर यांना सलाम केला. त्यांनी त्याचे उत्तर दिले आणि पुन्हा नमाज अदा करण्यास सांगितले. त्याने अदा केली आणि परत येऊन सलाम केला. त्यांनी त्याला पुन्हा नमाज अदा करण्यास सांगितले. असे दोन-तीन वेळा झाले. शेवटी, तो म्हणाला, ''मला नमाज कशी अदा करायची ते शिकवा''. पैगंबर म्हणाले नमाज अदा करण्यासाठी सर्वप्रथम वजू करा, मग, जर तुम्हाला पवित्र कुरआन चे काही वचन आठवत असेल तर ते पठन करा. नंतर रुकू करा आणि त्यानंतर सरळ उभे राहा. नंतर संयमाने सजदा करा. मग आरामात बसा. परत सजदा करा आणि मग उभे राहा. जर तुम्ही असे केले तर तुमची प्रार्थना पूर्ण होईल आणि जर तुम्हाला त्यात काही चुकले असेल तर तुमची प्रार्थना तेवढी चुकली आहे.

त्यानंतर हजरत उसैद बिन मलिक बिन रबीआचा उल्लेख आहे. इब्ने इसहाक म्हणतात की, अबू असीद बिन मलिक बिन रबिय्याह हे बद्रच्या युद्धात सहभागी झाले होते, जेव्हा त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस त्यांना दृष्टीचा त्रास झाला, तेव्हा ते म्हणाले, ''जर मी आज बद्रच्या ठिकाणी असतो आणि माझी दृष्टी चांगली असती, तर मी तुम्हाला ती दरी दाखवली असती जिथून देवदूत बाहेर आले होते. मला यात संदेह नाही. हजरत असीद बिन मलिक बिन रबिय्याह म्हणतात की आम्ही अल्लाहच्या प्रेषीताच्या जवळ बसलो होतो, तेव्हा बनू सलमाचा एक माणूस आला आणि म्हणाला, ''आपल्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतरही त्यांच्याशी चांगले वागणे आवश्यक आहे का? '' ते होय म्हणाले, त्यांच्यासाठी प्रार्थना करणे, क्षमा मागणे, त्यांची वचने पूर्ण करणे, त्यांच्या नातेवाईकांवर दया करणे, त्यांच्या मित्रांचा सन्मान करणे. या सर्व कृत्यांपासून, त्यांना बक्षीसही प्राप्त होत राहील आणि त्यांना क्षमा मिळत राहील.

उस्मान बिन अरकम यांनी त्यांच्या वडिलांकडून वर्णन केले, की पैगंबर (स.) बद्रच्या दिवशी म्हणाले, ''तुमच्याकडे असलेला युद्धधन सोडा. हजरत अबू असीद अल-सादी यांनी आयझूल मरजबान ची तलवार खाली ठेवली आणि हजरत अरकम पवित्र प्रेषिताला ती तलवार मागितली, ज्यावर त्यांनी ती तलवार त्यांना दिली.

हजरत अब्दुल्लाह बिन अब्दुल असद यांचा उल्लेख आहे. पवित्र प्रेषित (स.) यांनी त्यांना एक ध्वज दिला आणि दीडशे मुहाजिरीन आणि अन्सार यांना बनू असदला दडपण्यासाठी पाठवले. उहूद आणि बद्रच्या युद्धात त्यांनी सहभाग घेतला होता. उहुदच्या लढाईत एका हातावर लागलेल्या जखमे मुळे ३ जुमादी अल-आखीर १४ हिजरी रोजी त्यांचा निधन झाला.

त्यानंतर हजरत खलाद बिन राफे अल-झरकी यांचा उल्लेख केला आहे. हजरत खलाद बिन राफे हे अंसारच्या बनू खजरज समुदायातील अजलान शाखेचे होते. पवित्र प्रेषित (स.) यांनी ज्या व्यक्तीला प्रार्थना दोन किंवा तीन वेळा पुन्हा करण्यास सांगितले होते ते हजरत खलाद बिन राफेच होते.

त्यानंतर हजरत इबाद बिन बशर यांचा उल्लेख आहे. खंदकाच्या युद्धावेळी त्यांना प्रचंड सेवेची संधी मिळाली. हजरत इबाद बिन बशर यांनी, पवित्र प्रेषित (स.) च्या आदेशानुसार, यावेळी अबू सुफियान आणि त्याच्याबरोबर असलेल्या काही विरोधींचा सामना केला आणि त्यांना परत जाण्यास भाग पाडले. यावेळी पवित्र पैगबंर (स.) यांच्या तंबूचे रक्षण करण्याचे सौभाग्य त्यांना प्राप्त झाले. हजरत उम्मे सल्मा म्हणायचे की, अल्लाह इबाद बिन बशर वर कृपा करो, ते पवित्र प्रेषित (अल्लाह सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या साथीदारांपैकी सर्वात महत्वाचे होते, ज्यांनी त्यांच्या तंबूला चिकटून राहून नेहमी त्याचे संरक्षण केले.

त्यानंतर हजरत हातिब बिन अबी बलता यांचा उल्लेख आहे. ३० हिजरी मध्ये वयाच्या ६५ व्या वर्षी मदिना येथे त्यांचे निधन झाले आणि हजरत उस्मान यांनी त्यांच्या अंत्ययात्रेचे नेतृत्व केले. याकूब बिन उकबाकडून असे वर्णन केले गेले आहे की हातिब बिन अबी बल्ता ने त्यांच्या मृत्यूच्या दिवशी चार हजार दिनार आणि दिरहम मागे सोडले. एकदा त्यांचा एक गुलाम पवित्र प्रेषित (स.) यांच्याकडे तक्रार घेऊन आला आणि म्हणाला की हातिब नक्कीच नरकात जाईल. ते म्हणाले की तू खोटे बोललास. तो त्यात कधीही प्रवेश करणार नाही, कारण तो बद्रच्या युद्धात आणि हुदैबियाच्या शांतीकरारात सामील होता. सरतेशेवटी हुजूर अनवर म्हणाले की बद्री सहाबांचे आणखी काही उल्लेख बाकी आहे, ज्यांचा उल्लेख मी पुढे करेन, इन्शाल्लाह.

اَلْحَمْدُلِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔